शिक्षण सेवक नेमणुक मान्यता आदेश .

जा. क्र.जिपजा/शिक्षण/प्रा-६/२००३/६०५२
कार्यालय जिल्हा परिषद,जालना .
दिनांक :२० /१२/२००३

प्रति,
सचिव / मुख्याध्यापक,
मत्स्यदरी प्राथमिक शाळा धनसावंगी.

विषय :- शिक्षण सेवकाच्या नियुक्तीस मान्यता देणे बाबत.
संदर्भ :- १) शासन निर्णय पी.आर.ई/१०९८/१९४५/प्राशि-१ मंत्रालय, मुंबई दि. १०/०३/२०००
२) शासन निर्णय क्रमांक पीआरई क्र./१०९८(१९४५)/प्रा.शि--१/ दिनांक..१२ जुलै २००१.
३) शासन निर्णय क्रं./ पी.आर.ई/१०९८/१९४५/प्राशि-१ मंत्रालय, मुंबई दि. २७/०३/२००२
४) आपला प्रस्ताव .........–...........दिनांक ...१८/७/२००३

उपरोक्त संदर्भीय प्रस्तावास अनुसरून शाळेच्या आवश्यकतेप्रमाणे संस्थेने मान्य पदाच्या आधिन राहून नेमलेल्या शिक्षण सेवकाच्या नियुक्तीस संदर्भ क्रं.१,२,३ च्या शासन आदेशाच्या अटी व शर्तीनुसार शिक्षण सेवक योजना अंतर्गत शिक्षक सेवक म्हणून नियुक्ती पत्रातील अटी व शर्तीनुसार तसेच खालील अटींच्या आधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) आपल्या शाळेतील वर्ग/तुकड्या अनुदान प्राप्त असुन त्यासाठी आवश्यक कर्मचाऱ्यास संस्थेस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मान्यता दिलेली आहे. त्यापेक्षा जादा नेमलेल्या कर्मचारी यांच्या वेतनाची जबाबदारी शाळा/संस्थावर राहील.

२) कर्मचारी अनुसूची मंजुरी आदेशात विहीत केलेले प्रशिक्षित प्रमाण राखण्यात यावे.

३) महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या नियम क्रं.८ अन्वये आवश्यक ते मागासवर्गीय प्रमाण राखलेले असुन, मागास वर्गीय कर्मचारी यांच्या नेमणुका करण्याबाबतची कार्यवाही नियम क्रं.८ व ९ अन्वये पूर्ण करण्यात यावी.

४) या कार्यालयाकडुन अतिरिक्त शिक्षण आपणाकडे समावुन घेण्यासाठी पाठविल्यास त्यानुसार ते अतिरिक्त म्हणुन नेमले गेल्यास नेमणुक दिलेल्या शिक्षकाला/शिक्षण सेवकाला २४ तासाची नोटीस देऊन कमी करण्यात येईल. अशी लेखी समज त्यांना देण्यात यावी व त्यांची स्वाक्षरी घ्यावी.

५) सन.............. या वर्षात जादा वर्ग/तुकड्यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मान्यता मिळालेली असली तरी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने आर्थीक तरतुद उपलब्ध करून दिल्यास वेतन अदा केले जाईल. सदरील जादा तुकड्या अनुदान तत्वावर आल्याचे आदेश मिळाल्यानंतरच कर्मचाऱ्यांची देयके सादर करावीत.

६) शिक्षण सेवक म्हणुन नियुक्ती दिलेल्या एस.एस.सी./एच.एस.सी./डी.एड. उमेदवारास दरमहा रू. ३०००/- चे मानधन दिले जाईल. शिक्षण सेवकाच्या मानधनाची परिगणना मासीक पद्धतीने केली जाईल.